# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 13.10.2026** **वार : मंगळवार**

---

## ठळक बातम्या

1. राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ.
2. एसआयआर प्रकियेला कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांचं सर्वोच्च न्यायालयात आव्हान; तर कॉंग्रेस देशात अराजक माजवण्याचा प्रयत्न करत असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची टीका.
3. पाणबुडीरोधक नौका आयएनएस मंग्रोल नौदलात दाखल.
4. पुण्यात येत्या गुरुवारपासून पाणी कपात लागू.
5. ज्येष्ठ अभिनेत्री मधु कांबीकर यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार.

## सविस्तर बातम्या

**एसआयआर-मुदतवाढ**

केंद्रीय निवडणूक आयोगानं राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दावे आणि हरकती दाखल करण्यासाठी येत्या 26 ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी याकरिता 12 ऑक्टोबर ही अंतिम मुदत होती. प्राप्त दावे आणि हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया 10 नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी येत्या 16 नोव्हेंबरला प्रसिद्ध केली जाणार आहे.

**कॉंग्रेस मोर्चा**

कॉंग्रेससह विरोधी पक्षांच्या नेत्यांनी काल सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढला. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाला अर्थात एसआयआरला आव्हान देणारी याचिका, सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांना भेटून एसआयआरची प्रक्रिया आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीचं निवेदन देण्याचं कॉंग्रेसचं नियोजन होतं, पण यासंदर्भातल्या याचिकांवर न्यायालयात सुनावणी सुरू असल्याचं सांगून सरन्यायाधीशांनी ही भेट नाकारली होती.

कॉंग्रेसच्या या मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार टीका केली. सत्तेत येण्यासाठी देशात अराजक माजवण्याचा प्रयत्न कॉंग्रेस करत आहे, असल्याचं ते म्हणाले. यासंदर्भात नागपुरात बातमीदारांशी बोलताना ते म्हणाले...

***सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांनी आमचं निवेदन घेतलं पाहिजे आणि आमच्याशी चर्चा केली पाहिजे हे कोणत्या संविधानात लिहिलेलं आहे? सर्वोच्च न्यायालय सेपरेशन ऑफ पॉवर्स प्रमाणे वेगळं आहे. सर्वोच्च न्यायालयाला कोणाशीही चर्चा करता येत नाही' कुठलंही निवेदन घेता येत नाही. त्यांचा अधिकार तुम्ही केस टाका तुमच्या केसवर सुनावणी करण्याचा आहे परंतु जाणीवपूर्वक सर्वोच्च न्यायालयावर दबाव आणण्याचं काम चाललेलं आहे.***

**साखर समिती**

महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकारनं एका आठवडाभरात आता उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान तसंच अन्न आणि सार्वजनिक

वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी काल दिल्लीत दोन्ही राज्यांतील उस उत्पादक शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. त्यानंतर ही घोषणा कऱण्यात आली. केंद्र आणि राज्य सरकारांचे प्रतिनिधी, शेतकरी संघटना, साखर कारखान्याचे प्रतिनिधी आणि संबंधित विषय तज्ज्ञ यांचा या समितीत समावेश असेल.

**रुग्णालये-सूचना**

रुग्णालयं आणि वैद्यकीय संस्थांमध्ये उपलब्ध उपचार, सेवा आणि सुविधांचं शुल्क ठळकपणे प्रदर्शित करण्याची व्यवस्था सुनिश्चित करावी, असं आवाहन केंद्र सरकारनं सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना केलं आहे. यासंदर्भात केंद्रीय आरोग्य सचिव पुण्या सलीला श्रीवास्तव यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून संबंधित नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

**आयएनएस-मंग्रोल**

आयएनएस मंग्रोल ही उथळ पाण्यात काम करणारी पाणबुडीरोधक नौका काल भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. मुंबईत नौदलाच्या गोदीमध्ये काल हा कार्यक्रम झाला. पश्चिम नौदल कमांडचे प्रमुख व्हाईस ॲडमिरल संजय वात्स्यायन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कोचीन शिपयार्डनं या नौकांची निर्मिती केली आहे. या नौकेमध्ये 80 टक्के स्वदेशी भाग वापरले आहेत. अशा 10 नौका यावर्षी नौदलात सामील झाल्या असून आणखी 8 नौका लवकरच सामील होतील असं वात्स्यायन म्हणाले.

**सिंहस्थ-कुंभमेळा**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये  येत्या 30 ऑक्टोबर ते 1 नोव्हेंबर  या कालावधीत तीन दिवसांच्या  धार्मिक सोहळ्याचं  आयोजन करण्यात आलं आहे. मुख्य सोहळ्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रित करण्यात आलं असल्याची माहिती कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. 30 ऑक्टोबर रोजी ग्रामपरिक्रमेनं या सोहोळ्याला सुरुवात होणार आहे.

**कर्जमुक्ती यादी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत राज्यातील जवळपास 3 लाख 51 हजार  शेतकऱ्यांचा समावेश आहे. संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या कर्जखात्याची थकबाकी तपासून आधार प्रमाणीकरण करून घ्यावं, असं आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केलं आहे..

**प्रधानमंत्री उज्वला योजना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सार्वजनिक क्षेत्रातील कारकीर्दीची 25 वर्षे पूर्ण करत आहेत. यानिमित्त सुरू असलेल्या आमच्या विशेष वृत्तमालिकेत आज जाणून घेऊया प्रधानमंत्री उज्वला योजनेविषयी...

***'प्रधानमंत्री उज्ज्वला योजना 2016 मध्ये सुरु करण्यात आली. या योजनेचा उद्देश मुख्यत्वेकरून गरीब कुटुंबांतील महिलांना स्वयंपाकाचं स्वच्छ इंधन उपलब्ध करून देणं, त्याच्या  आरोग्याची काळजी घेत त्यांना प्रतिष्ठा आणि समान संधी मिळवून देणं हा होता.***

***या योजनेअंतर्गत गॅस जोडणी महिलेच्या नावे देण्यात आली. या योजनेमुळे लाखो कुटुंबांची  सरपण, शेणाच्या गोवऱ्या आणि प्रदूषण करणाऱ्या अन्य  इंधनांपासून सुटका झाली. यामुळे महिलांचा वेळ वाचला आणि त्यांचा कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढण्यास मदत झाली.***

***2014 मध्ये देशात एलपीजी जोडण्याची संख्या साडेचौदा कोटीच्या आसपास होती, 2026 मध्ये ही संख्या 33 कोटी 39 लाखांवर पोहोचली. या मोहिमेचे फायदे केवळ स्वयंपाकघरापुरते मर्यादित नाहीत. स्वच्छ इंधनामुळे अनेक घरातील वायू प्रदूषण कमी झालं आहे, सरपण गोळा करण्यात जाणारा वेळ वाचल्यामुळे महिलांना शिक्षण आणि रोजगारासाठी अधिक वेळ देता येतो आहे आणि महिलांसाठी अधिक संधीही  उपलब्ध होत आहेत. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी पुण्याहून संध्या खान.***

**सौर-संवाद 2026**

सौर ऊर्जेतील उद्योजकता आणि रोजगाराच्या संधी ग्रामीण भागापर्यंत पोहोचवण्यासाठी आयोजित सौर संवाद यात्रेचा काल अहिल्यानगर इथं आरंभ झाला. गोपाल काबरा फाउंडेशन आणि जीके एनर्जी यांनी आयोजित केलेली ही यात्रा राज्यातल्या 14

जिल्ह्यांतून जाणार असून, 18 ऑक्टोबरला या यात्रेचा पुण्यात समारोप होणार आहे. युवक आणि महिलांना सौर क्षेत्रातील व्यवसायासाठी प्रोत्साहित करून एक हजाराहून अधिक उद्योजकांना सक्षम करण्याचं उद्दिष्ट असल्याचं गोपाल काबरा यांनी सांगितलं.

**नानाजी देशमुख**

राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य देऊन ग्रामीण विकासाचं काम करणारे नानाजी देशमुख यांचं कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे, असं प्रतिपादन बीडच्या जन शिक्षण संस्थानचे संचालक गंगाधर देशमुख यांनी काल केलं. नानाजी देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**निबंध स्पर्धा**

चवदार तळे सत्याग्रहाचं यंदा शताब्दी वर्ष आहे, तसंच महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीचंही द्विशताब्दी वर्ष आहे, या निमित्त नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठाननं राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचं आयोजन केलं आहे. या स्पर्धेत राज्यातील विद्यापीठे आणि त्या अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल.

**पोषण आहार**

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत जालना जिल्ह्यातील 600 क्षयरुग्णांना पोषण आहाराचं पाकीट देण्यात येणार आहेत. सामाजिक दायित्व निधीतून हा उपक्रम राबवण्यात येत आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते काल 10 रुग्णांना प्रातिनिधिक स्वरूपात पोषण आहाराचं वितरण करण्यात आलं.

**पुणे पाणीपुरवठा**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. राज्य शासनाने पाणी पुरवठ्यात दहा टक्के कपात करण्याचे निर्देश दिल्यानंतर पुणे महापालिकेनं हा निर्णय घेतला आहे. येत्या गुरुवारपासून म्हणजे 15 तारखेपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे.

**मधु कांबीकर-निधन**

ज्येष्ठ मराठी अभिनेत्री मधु कांबीकर यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यात येरवडा इथल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मधू कांबीकर यांचं काल प्रदीर्घ आजारानं निधन झालं. त्या 73 वर्षांच्या होत्या. बीड जिल्ह्यात माळेगाव खुर्द इथं जन्मलेल्या मधू कांबीकर यांनी तमाशातून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. व्यावसायिक रंगभूमीवर महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमात त्या लावणी सादर करत. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये काम केलं. शापित हा त्यांचा पहिला चित्रपट होता. त्यानंतर त्यांचे 'हेच माझं माहेर', 'राघू मैना', 'एक होता विदूषक झपाटलेला' असे अनेक चित्रपट विशेष लोकप्रिय ठरले. लोकनाट्य, रंगभूमी, चित्रपट, आणि दूरदर्शन मालिका अशा सर्व माध्यमांमध्ये त्यांनी अभिनय आणि नृत्यकला सादर केली. मधु कांबीकर यांच्यामुळे लावणीला जागतिक ओळख मिळाली असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी मधु कांबीकर यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**हवामान**

कोकणात आज  तुरळक ठिकाणी उष्ण आणि दमट हवामानाची शक्यता असून मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**